नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - १७४ Issue - 174 | वार गुरुवार दि. १३ नोव्हेंबर २०२५ Blow- Thursday Date 13 November 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# दिल्लीतील स्फोट हा दहशतवादी हल्ला

## दिल्ली स्फोटानंतर मोदी सरकारचा मोठा निर्णय; बॉम्ब स्फोटाचा तपास राष्ट्रीय तपास यंत्रणेकडे सोपवला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली: केंद्र सरकारनं दिल्ली स्फोटाबद्दल महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. लाल किल्लयाजवळ झालेला स्फोट दहशतवादी हल्ला मानण्यात आला आहे. कारमध्ये झालेला स्फोट अतिशय गंभीर दहशतवादी घटना असल्याचं सरकारनं म्हटलं होतं. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या अध्यक्षतेखाली दिल्लीत कॅबिनेटची बैठक झाली. त्यात दिल्ली बॉम्ब स्फोटाबद्दल एक प्रस्ताव मंजूर करण्यात आला.

१० नोव्हेंबर २०२५ रोजी दिल्लीतील लाल किल्ला परिसरात एका कारमध्ये झालेला स्फोट दहशतवादी घटना असल्याचं म्हणत केंद्रीय मंत्रिमंडळानं याबद्दल शोक व्यक्त केला. हल्लयात मृत्यूमुखी पडलेल्यांच्या स्मरणार्थ दोन मिनिटं मौन पाळण्यात आलं. मृतांना श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी एक महत्त्वाचा प्रस्ताव ठेवण्यात आला. दहशतवाद्यांच्या सगळ्या स्वरुपांसंदर्भात भारताचं धोरण शून्य सहिष्णूतेचं असेल, असा उल्लेख प्रस्तावात आहे.

दिल्ली स्फोटाचा तपास अतिशय वेगानं करण्यात यावा, असे आदेश मंत्रिमंडळातून देण्यात आल्याचा उल्लेख प्रस्तावात आहे. 'स्फोटामागे असलेले गुन्हेगार, त्यांचे सहकारी आणि त्यांचे पुरस्कर्ते यांची ओळख पटवण्यात यावी. त्यांना त्वरित न्यायाच्या चौकटीत आणावं. त्यांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभं करावं. सरकार सर्व परिस्थितीवर डोळ्यात तेल घालून लक्ष ठेवून आहे,' असं प्रस्तावात नमूद करण्यात आलं आहे.

सोमवारी संध्याकाळी सातच्या सुमारास लाल किल्ला मेट्रो स्थानकाच्या जवळ एका हुंडाई आय २० कारमध्ये स्फोट झाला. या स्फोटानंतर आसपासच्या वाहनांनादेखील आग लागली. या स्फोटात १२ जणांचा मृत्यू झाला, तर २० पेक्षा अधिक जण जखमी झाले. सरकारनं बॉम्ब स्फोटाचा तपास राष्ट्रीय तपास यंत्रणा अर्थात एनआयएकडे सोपवला आहे.

केंद्रीय गृह मंत्री अमित शहांच्या अध्यक्षतेखाली एक उच्च स्तरीय बैठक बोलावण्यात आली होती. त्यात बडे अधिकारी सहभागी झाले होते. दिल्लीतील लाल किल्ला परिसरात झालेल्या स्फोटाच्या तपासाची जबाबदारी एनआयएकडे सोपवण्याचा निर्णय बैठकीत झाला. आज सकाळी पंतप्रधान नरेंद्र मोदी लोक नायक रुग्णालयात गेले होते. तिथे जाऊन त्यांनी स्फोटात जखमी झालेल्यांची भेट घेऊन त्यांची विचारपूस केली. यानंतर रात्री कॅबिनेटची बैठक झाली. दिल्लीतील स्फोटानंतर झालेली कॅबिनेटची ही पहिलीच बैठक आहे.



# दिल्ली स्फोट प्रकरणी पोलिसांना मोठे यश; अखेर 'ती' कार सापडली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली: दिल्लीच्या लाल किल्ला परिसरात झालेल्या स्फोटाचा तपास करणाऱ्या यंत्रणांना मोठं यश मिळालं आहे. फरीदाबाद पोलिसांनी लाल रंगाची फोर्ड इकोस्पोर्ट कार जप्त केली आहे. ऊ्ह १० उघ ०४५८ क्रमांकाची कार खंदावली गावाजवळ सापडली. ही कार कुठे दिसल्यास तातडीनं माहिती देण्याचं आवाहन दिल्ली पोलिसांकडून करण्यात आलं होतं. आता ही कार पोलिसांच्या हाती लागली आहे.

पोलिसांनी कार ताब्यात घेऊन तिला फॉरेन्सिक तपासासाठी पाठवलं आहे. दिल्ली पोलीस आणि अन्य केंद्रीय यंत्रणांना याची माहिती देण्यात आली आहे. सुरक्षेच्या कारणास्तव पोलिसांनी आसपासचा परिसर रिकामा केला आहे. या कारची नोंदणी २२ नोव्हेंबर २०१७ रोजी दिल्लीच्या राजौरी गार्डनर आरटीओमध्ये करण्यात आली होती. ही कार उमर उन नबी ऊर्फ उमर मोहम्मदच्या नावावर खरेदी करण्यात आल्याची माहिती पोलीस तपासातून समोर आली आहे. दिल्ली स्फोटातील प्रमुख संशयितांमध्ये उमरचा समावेश आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,



उमर मोहम्मदनं कार खरेदी करताना खोट्या पत्त्याचा वापर केला. त्यानं कागदपत्रांमध्ये उत्तर दिल्लीच्या एका घराचा पत्ता दिला. दिल्ली पोलिसांनी रात्री उशिरा त्या घरावर छापा टाकला. पण तिथे कोणीही सापडलं नाही. लाल रंगाची फोर्ड इकोस्पोर्ट्स कार खंदावली गावात कोणी आणि कधी सोडून दिली, याचा शोध पोलिसांकडून घेतला जात आहे. खंदावली गावात फोर्ड इकोस्पोर्ट कार सापडल्याच्या वृत्ताला क्राइमचे डीसीपी मुकेश मल्होत्रा यांनी दुजोरा दिला. या कार संदर्भात तपास यंत्रणांनी रेड अलर्ट जारी केला होता. सोमवारी संध्याकाळी लाल किल्लयाजवळ हुंडाई आय २० कारमध्ये स्फोट झाला. त्यात १२ जणांचा मृत्यू झाला. त्यानंतर तपास यंत्रणांनी इकोस्पोर्ट कारचा शोध सुरु केला होता. पोलिसांना इकोस्पोर्ट कार खंदावली गावात सापडली. हा भाग बल्लभगढ परिसरात येतो. फरीदाबादच्या धौज परिसरातून स्फोटकं हस्तगत केल्यानंतर आणि दिल्लीत झालेल्या स्फोटानंतर हरियाणा पोलीस हाय अलर्टवर आहेत. मंगळवारी पोलिसांनी या भागात मोठा फौजफाटा उतरवला आणि आसपासच्या भागात सर्च ऑपरेशन सुरु केलं. पोलिसांनी नऊ धोकादायक गुन्हेगारांना अटक केली आहे. इकोस्पोर्ट कार संदर्भात अलर्ट जारी करण्यात आल्यावर दिल्ली, हरियाणा, उत्तर प्रदेशात एकच खळबळ उडाली होती. या कारमध्ये स्फोटक असण्याची शक्यता वर्तवली जात होती.

# काश्मिरात छापेसत्र तीव्र; जमात-ए-इस्लामीशी संबंधित ३०० ठिकाणी कारवाई, अनेक जण ताब्यात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

श्रीनगर: राजधानी दिल्लीत लाल किल्लयाजवळ झालेल्या भीषण स्फोटाच्या पार्श्वभूमीवर, पोलिसांनी जम्मू आणि काश्मिरातील दहशतवादी गटांवर कारवाई तीव्र केली असून काश्मीर खोऱ्यातील बंदी घातलेल्या जमात-ए-इस्लामीशी (जेईआय) संबंधित ३०० हून अधिक ठिकाणी छापेमारी केली.



जेईआयशी संबंधित घटक वेगवेगळ्या आघाड्यांवर पुन्हा कारवाया सुरू करण्याच्या तयारीत असल्याची विश्वसनीय गुप्तवार्ता पोलिसांना मिळाली होती. याआधारे हे छापे घालण्यात आल्याचे पोलिस अधिकाऱ्यांनी सांगितले. कुलगाम, पुलवामा, शोपियाँ, बारामुल्ला आणि गंदरबल जिल्ह्यांमध्ये अनेक ठिकाणी कारवाई करण्यात आली. 'जेईआय'चे सदस्य आणि त्यांच्या साथीदारांच्या निवासस्थानी आणि त्यांच्याशी संबधित परिसरात शोधमोहीम राबवण्यात आली. दहशतवाद्यांना मदत करणाऱ्यांच्या मुळावरच घाव घालण्यासाठी ही कारवाई करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले.

दक्षिण काश्मिरातील कुलगाम जिल्ह्यात २०० हून अधिक ठिकाणी छापे मारण्यात आले. मागील चार दिवसांत जिल्ह्याच्या विविध भागांत दहशतवाद्यांना मदत करणाऱ्या व्यक्ती (ओजीडब्ल्यू), पाकिस्तानातून कारवाया करणारे जम्मू आणि काश्मीरचे निवासी (जेकेएनओपी), याआधी चकमकी झालेली ठिकाणे, सक्रिय; तसेच मारल्या गेलेल्या दहशतवाद्यांची लपण्याची ठिकाणे आदी ठिकाणी ४०० हून अधिक शोधमोहिमा राबवण्यात आल्या. या मोहिमेअंतर्गत पाकिस्तानातून कारवाया करणारे जम्मू आणि काश्मीरचे निवासी; तसेच बंदी घातलेल्या इतर संघटनांशी संबंधित अशा सुमारे ५०० व्यक्तींची चौकशी करण्यात आली. त्यापैकी अनेकांना प्रतिबंधात्मक कायद्यांतर्गत ताब्यात घेऊन अनंतनाग येथील जिल्हा कारागृह मट्टन येथे हलविण्यात आले आहे.

उत्तर काश्मिरातील बारामुल्ला जिल्ह्यात पोलिस व इतर सुरक्षा दलांच्या समन्वयाने सोपोर, झैंगीर आणि रफियाबाद भागात ३० हून अधिक ठिकाणी एकाच वेळी छापे टाकण्यात आले. या सर्व जिल्ह्यांतून आक्षेपार्ह साहित्य आणि डिजिटल उपकरणे जप्त करण्यात आली. 'जेईआय'च्या अनेक संशयितांना ताब्यात घेण्यात आले.

सपोर्ट सिस्टिम उद्धवस्त करण्यासाठी कारवाई

दहशतवादी आणि फुटीरतावादी गटांना मदत करणारी व्यवस्था उद्धवस्त करणे, दहशतवाद्यांचे वैचारिक, आर्थिक आणि रसदपुरवठा करणारे गट नेस्तनाबूत करणे आणि शांतता अबाधित राहील याची खात्री करणे या उद्देशाने जम्मू आणि काश्मीर पोलिसांनी सातत्यपूर्ण प्रतिबंधात्मक धोरणाअंतर्गत या कारवाया केल्या, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय

# शिवसेना चिन्हाच्या वादावरील अंतिम सुनावणी २१ जानेवारी रोजी घेणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फूट पडल्यावर पक्षाचे नाव आणि निवडणूक चिन्हाच्या वादावरील अंतिम सुनावणी आता पुढच्याच वर्षी होणार आहे. या प्रकरणात २१ जानेवारी २०२६ रोजी पुढील सुनावणी घेतली जाईल, असे सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी स्पष्ट केले. त्याबरोबरच राष्ट्रवादी काँग्रेसमधील अशाच मुद्यावरील सुनावणीही घेतली जाईल. ही सुनावणी दुसऱ्या दिवशीही (२२ जानेवारी) चालू राहील असे न्या. सूर्यकांत यांनी तोंडी सांगितले. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीपूर्वी याबाबत सुनावणी घ्यावी अशी उबाठा पक्षाने मागणी केली होती. मात्र ती मान्य झाली नाही.




एकनाथ शिंदे गटाला अधिकृत शिवसेना म्हणून मान्यता देण्याच्या आणि त्यांना 'धनुष्यबाण' निवडणूक चिन्ह बहाल करण्याच्या निवडणूक आयोगाच्या निर्णयाला आव्हान देणारी याचिका उबाठा पक्षाने दाखल केली आहे.

गेली ३ वर्षे त्यावर सुनावणी सुरू आहे. त्याची सुनावणी न्यायमूर्ती सूर्यकांत आणि जयमाल्या बागची यांच्या खंडपीठासमोर झाली. शिवसेनेच्या प्रकरणाबरोबरच राष्ट्रवादी काँग्रेसमधील अजित पवार गटाला पक्षाचे अधिकृत निवडणूक चिन्ह देण्याच्या निवडणूक आयोगाच्या निर्णयाविरुद्ध शरद पवार गटाने दाखल केलेल्या याचिकेवरही पुढील सुनावणीत विचार करण्यासही खंडपीठाने सहमती दर्शविली.

या दोन्ही प्रकरणांमधील कायदेशीर मुद्दे समान आणि एकमेकांवर अवलंबून असल्याचे निरीक्षण नोंदवून न्यायालयाने प्रकरणांची एकत्रित सुनावणी घेण्यास सहमती दर्शविली. २१ जानेवारी रोजी सकाळी ११.३० वाजता या प्रकरणाची सुनावणी घेण्यात येईल, असे खंडपीठाने सांगितले. गरज पडल्यास सुनावणी दुसऱ्या दिवशीही सुरू राहू शकेल. यासाठी २२ जानेवारी रोजीही कोणतेही महत्त्वाचे प्रकरण पोस्ट करू नये, असे आदेश न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी न्यायालयाच्या प्रमुखांना दिले.

आजच्या काही मिनिटांच्या सुनावणीत उबाठा पक्षाकडून अभिषेक मनु सिंघवी आणि देवदत्त कामत यांनी तर शिवसेनेच्या वतीने ज्येष्ठ वकील मुकुल रोहतगी आणि एन के कौल यांनी हजेरी लावली. उबाठा पक्षाच्या याचिकेत निवडणूक आयोगाच्या फेब्रुवारी २०२३ च्या त्या आदेशाला आव्हान देण्यात आले आहे, ज्यात २०२२ मध्ये शिवसेनेत फूट पडल्यानंतर निवडणूक आयोगाने पक्षाचे नाव आणि चिन्ह शिंदे यांच्या नेतृत्वाखालील गटाला बहाल केले होते. ठाकरे यांच्या गटाने असा युक्तिवाद केला आहे की, निवडणूक आयोगाने संघटनात्मक रचनेत पक्षाच्या बहुमताची खरी कसोटी विचारात न घेता त्याऐवजी निवडून आलेल्या आमदारांमध्ये शिंदे गटाच्या ताकदीला अवाजवी महत्त्व दिले.


सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणात नोटीस बजावताना उबाठा पक्षाला शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) हे नाव आणि ज्वलंत मशाल हे चिन्ह कायम ठेवण्याची परवानगी दिली होती. त्याचप्रमाणे न्यायालयाने शरद पवार गटाला तुतारी फुंकणारा माणूस हे चिन्ह वापरण्याची परवानगी देणारी अंतरिम व्यवस्था केली होती आणि अजित पवार गटाला घड्याळ चिन्हाचा वापर करताना, हे न्यायप्रविष्ट प्रकरण आहे हे ठळकपणे प्रसिद्ध करण्यास सांगितले होते.

# मुंबईहून वाराणसी निघालेल्या विमानाची इमर्जन्सी लँडिंग, ५ विमानतळांना बॉम्बने उडवून देण्याची धमकी

मुंबई : आताच्या घडीची मोठी बातमी समोर आली आहे. मुंबईहून वाराणसीच्या दिशेला निघालेलं विमान हवेत असताना ते विमान बॉम्बने उडवून देण्याची धमकी आली आहे. त्यामुळे या विमानाचं तातडीने इमर्जन्सी लँडिंग करण्यात आलं आहे. तातडीने सुरक्षा यंत्रणा कामाला लागले आहेत. तसेच देशातील ५ महत्त्वाच्या आंतरराष्ट्रीय विमानतळांना थेट बॉम्बने उडवून देण्याची धमकी आली आहे. यामुळे कडेकोट बंदोबस्त वाढवण्यात आला आहे. या धमकीनंतर अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. आता या प्रकरणात काय अपडेट येते? याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.

मुंबईहून वाराणसीच्या दिशेला जाणाऱ्या एअर इंडिया एक्सप्रेस फ्लाईटला बॉम्बने उडवून देण्याची धमकी देण्यात आली आहे. विशेष म्हणजे ही फ्लाईट हवेत असताना हा धमकीचा मेल आला. यानंतर लाल बहादूर शास्त्री आंतरराष्ट्रीय विमानतळावर तातडीने हाय अलर्ट जारी करण्यात आला. विशेष म्हणजे विमानाची तातडीने इमरजन्सी लँडिंग करावी लागली आणि सर्व प्रवाशांना सुरक्षित बाहेर काढण्यात आलं. यानंतर आता विमानात बॉम्ब शोधक आणि नाशक पथकाची कारवाई सुरु आहे. अधिकाऱ्यांकडून आता धमकी प्रकरणात सखोल तपास केला जातोय. याबाबत लवकरच महत्त्वाची अपडेट समोर येईल, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

जिल्हा परिषद व नगरपालिका निवडणूक




प्रचार साहित्य

अत्याधुनिक निवडणूक मोबाईल ॲप वापरा व हमखास निवडून या.

फक्त आमच्या कडेच



मतदार स्लिप नांव व मतदान केंद्रासहीत फक्त आमच्याकडेच मिळतील.

प्रचार साहित्य

१. डमी वोटिंग मशिन
२. झेंडे, टोपी, पंचा ३. बिल्ले
४. मतदार स्लिप ५. स्टिकर ६. पॉम्प्लेटस
७. स्लिप प्रिंटर ८. सॉफ्टवेअर
९. बॅचेस १०. एस.एम.एस./व्हाईस कॉल

नितीन कन्सलटन्सी

नितीन हलसगी
मो. 9595427070 / 9270325070

## संपादकीय....

### शोधमोहीम

राजधानी दिल्लीत लाल किल्ल्याजवळ झालेल्या भीषण स्फोटाच्या पार्श्वभूमीवर, पोलिसांनी जम्मू आणि काश्मिरा-तील दहशतवादी गटांवर कारवाई तीव्र केली असून काश्मीर खोऱ्यातील बंदी घातलेल्या जमात-ए-इस्लामीशी (जेईआय) संबंधित ३०० हून अधिक ठिकाणी छापेमारी केली. जेईआयशी संबंधित घटक वेगवेगळ्या आघाड्यांवर पुन्हा कारवाया सुरू करण्याच्या तयारीत असल्याची विश्वसनीय गुप्तवार्ता पोलिसांना मिळाली होती. याआधारे हे छापे घालण्यात आल्याचे पोलिस अधिकाऱ्यांनी सांगितले. कुलगाम, पुलवामा, शोपियाँ, बारामुल्ला आणि गंदरबल जिल्ह्यांमध्ये अनेक ठिकाणी कारवाई करण्यात आली. 'जेईआय'चे सदस्य आणि त्यांच्या साथीदारांच्या निवासस्थानी आणि त्यांच्याशी संबधित परिसरात शोधमोहीम राबवण्यात आली. दहशतवाद्यांना मदत करणाऱ्यांच्या मुळावरच घाव घालण्यासाठी ही कारवाई करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले. दक्षिण काश्मिरातील कुलगाम जिल्ह्यात २०० हून अधिक ठिकाणी छापे मारण्यात आले. मागील चार दिवसांत जिल्ह्याच्या विविध भागांत दहशतवाद्यांना मदत करणाऱ्या व्यक्ती (ओजीडब्ल्यू), पाकिस्तानातून कारवाया करणारे जम्मू आणि काश्मीरचे निवासी (जेकेएनओपी), याआधी चकमकी झालेली ठिकाणे, सक्रिय; तसेच मारल्या गेलेल्या दहशतवाद्यांची लपण्याची ठिकाणे आदी ठिकाणी ४०० हून अधिक शोधमोहिमा राबवण्यात आल्या. या मोहिमेअंतर्गत पाकिस्तानातून कारवाया करणारे जम्मू आणि काश्मीरचे निवासी; तसेच बंदी घातलेल्या इतर संघटनांशी संबंधित अशा सुमारे ५०० व्यक्तींची चौकशी करण्यात आली. त्यापैकी अनेकांना प्रतिबंधात्मक कायद्यांतर्गत ताब्यात घेऊन अनंतनाग येथील जिल्हा कारागृह मट्टन येथे हलविण्यात आले आहे. उत्तर काश्मिरातील बारामुल्ला जिल्ह्यात पोलिस व इतर सुरक्षा दलांच्या समन्वयाने सोपोर, झैंगीर आणि रफियाबाद भागात ३० हून अधिक ठिकाणी एकाच वेळी छापे टाकण्यात आले. या सर्व जिल्ह्यांतून आक्षेपार्ह साहित्य आणि डिजिटल उपकरणे जप्त करण्यात आली. 'जेईआय'च्या अनेक संशयितांना ताब्यात घेण्यात आले. दहशतवादी आणि फुटीरतावादी गटांना मदत करणारी व्यवस्था उद्ध्वस्त करणे, दहशतवाद्यांचे वैचारिक, आर्थिक आणि रसदपुरवठा करणारे गट नेस्तनाबूत करणे आणि शांतता अबाधित राहील याची खात्री करणे या उद्देशाने जम्मू आणि काश्मीर पोलिसांनी सातत्यपूर्ण प्रतिबंधात्मक धोरणाअंतर्गत या कारवाया केल्या.

# दयाळूपणा : मानवी अस्तित्वाचा जिवंत आधार : डॉ. राजेंद्र बगाटे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मानवी जीवनाची मूलभूत रचना ही परस्परावलंबनावर आधारलेली आहे. आपण एकमेकांशिवाय जगू शकत नाही ही वस्तुस्थिती जशी खगोलशास्त्रीय तत्त्वांनी सिद्ध होते, तशीच ती समाजशास्त्रीय आणि मनोवैज्ञानिक अभ्यासांतही सिद्ध होते. माणूस हा सामाजिक प्राणी आहे ही परिभाषा केवळ पाठ्यपुस्तकातील ओळ म्हणून आपण स्वीकारली असली तरी या वाक्यातील 'सामाजिक' या शब्दाच्या मागे दडलेले सर्वांत संवेदनशील, सुक्ष्म आणि गहीरे तत्त्व म्हणजेच दयाळूपणा होय. याच भावनेची जाणीव तेव्हा आणखी स्पष्ट होते, जेव्हा आपण १३ नोव्हेंबर रोजी साजरा होणारा 'जागतिक दयाळूपणा दिवस' साजरा करतो. या दिवसाचे औचित्य आपल्याला केवळ एखादी औपचारिक स्मृती नव्हे, तर मानवी सभ्यतेच्या मूळ आत्म्याची पुनश्च आठवण करून देते. दयाळूपणा हा कोणत्याही अर्थाने केवळ दान करणे, मदत देणे, सहानुभूती व्यक्त करणे एवढ्यावर मर्यादित न राहता, हा माणसाच्या व्यक्तिमत्वाचा, विचारप्रणालीचा आणि सामाजिक व्यवहार संस्कृतीचा केंद्रबिंदू आहे.

इतिहासाच्या पृष्ठांवर नजर टाकली तर जगातील सर्व धर्म, तत्त्वज्ञान, समाजव्यवस्था आणि क्रांतिकारक विचारधारा 'दयाळूपणाला' मानवी जीवनाच्या अविभाज्य घटकाच्या रूपाने मांडताना दिसतात. गौतम बुद्धांच्या करुणावादापासून महावीरांच्या अहिंसेपर्यंत, सूफी संतांच्या प्रेमसंवादापासून संत तुकारामांच्या वारकरी भावपरंपरेपर्यंत, गांधीजींच्या 'अहिंसा आणि सत्य' तत्त्वज्ञानापासून ते आधुनिक काळातील मानवतावादी चळवळीपर्यंत सर्वांनी दयाळूपणाला मानवी प्रगतीचे मूळ स्वरूप मानले. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले तर दयाळूपणा ही मानवी संबंधांची बंधरचना दृढ करणारी अदृश्य साखळी आहे. कुठलीही संस्कृती परस्परांतील विश्वास, आदर आणि सहजीवन यांवर उभी असते. आणि या तिन्ही मूल्यांच्या पायावर दयाळूपणाचा कौल असणे आवश्यक असते. दयाळूपणा नसलेली व्यक्ती केवळ भौतिकदृष्ट्या यशस्वी होऊ शकते, परंतु मानवी अर्थाने ती परिपूर्ण होत नाही.

असे असताना आजच्या जागतिकीकरणाच्या, यांत्रिकीकरणाच्या, तंत्रज्ञानाधारित वेगवान जीवनशैलीने मानवी संवाद अधिकाधिक डिजिटल केला आहे. संदेश, अभिवादन, चिंता, जवळीक यांना भौतिक स्वरूपापेक्षा डिजिटल स्वरूप प्राप्त झाले. भावनांची देवाणघेवाण ही प्रत्यक्ष संवादातून न होता आभासी माध्यमांद्वारे व्हायला लागली. या प्रक्रियेत एक महत्त्वाची गोष्ट हरवू लागली ती म्हणजे भावनिक जवळीक होय. जवळीक कमी झाल्यावर हळूहळू करुणा कमी होते, करुणा कमी झाली की दयाळूपणा कमी होतो. एखाद्याचे दुःख पाहणे, त्याच्या डोळ्यांतील पाणी ओळखणे, त्याच्या आवाजातील वेदनेचा सूर जाणवणे ही क्षमता कमकुवत होऊ लागली. समाजशास्त्र सांगते की जेव्हा समाजाची भावनिक संवेदनशीलता घटते तेव्हा समाजात स्वार्थ, भेदभाव, विभाजन, असहिष्णुता, हिंसा आणि तणाव वाढू लागतात. आणि हेच आपण जगभरात विविध स्वरूपांत पाहू लागलो आहोत.

आजचे जग भांडवलशाहीच्या स्पर्धात्मक मूल्यांनी व्यापलेले आहे. इतरांपेक्षा पुढे जाणे, अधिकाधिक मिळवणे, यशाचे मोजमाप आर्थिक आणि भौतिक निकषांनी करणे आणि त्यामध्ये मानवी संबंध आणि भावनिक मूल्यांकडे दुर्लक्ष करणे हा प्रवाह वाढतो आहे. समाजशास्त्रीय भाषेत याला 'मानवीकरणाचा क्षय' (Dehumanization) म्हणतात. ज्या समाजात दयाळूपणाचा अभाव वाढतो त्या समाजात व्यक्तींची ओळख त्यांच्या हक्कांपेक्षा कर्तव्यांच्या मर्यादेत, संबंधांपेक्षा व्यवहारांमध्ये, भावना पेक्षा तर्काच्या कोरडेपणात अडकू लागते. आणि अशावेळी दयाळूपणा हा केवळ नैतिक मूल्य नसून समाजाच्या पुनरुज्जीवनाचा मार्ग बनतो. कारण दयाळूपणाचे एक विलक्षण वैशिष्ट्ये म्हणजे तो 'वाटला' की कमी न होता अधिक वाढतो.

दयाळूपणाचा एक महत्त्वाचा पैलू म्हणजे सहानुभूतीहोय. म्हणजे 'समोरच्या व्यक्तीच्या परिस्थितीचे, वेदनेचे, आनंदाचे, असुरक्षिततेचे अचूक भान निर्माण करणे'. केवळ समजून घेणे नाही तर त्या जाणिवेतून कृतीकडे जाणे हा खरा दयाळूपणा होय. एखाद्या वृद्ध व्यक्तीला रस्ता ओलांडण्यास मदत करणे, परीक्षेत अपयशी झालेल्या विद्यार्थ्याला आधार देणे, निराश झालेल्या मित्राच्या मनातील गुंता समजून घेणे, भुकेलेल्या व्यक्तीस अन्न देणे, वा फक्त कोणाच्या दुःखाच्या क्षणी काहीच बोलू न देता शांतपणे सोबत राहणे या कृतींचे मूल्य पैशात मोजता येत नाही, पण या कृती मनुष्याला मनुष्य म्हणून सिद्ध करतात.

सध्याच्या काळात जागतिक स्तरावर विविध मानवी संकटे उभी आहेत; युद्धे, स्थलांतर, दारिद्र्य, सामाजिक असमानता, पर्यावरणीय संकटे, मानसिक आरोग्याचे प्रश्न, तुटलेली कुटुंबव्यवस्था, वाढता तणाव, असहिष्णुता, सायबर धमक्या, सोशल मीडियामुळे निर्माण होणारी तुलना आणि कमतरतेची भावना इत्यादी. या सर्व समस्यांमागे एक अदृश्य पण प्रमुख कारण दिसते ते म्हणजे मानवी संबंधांची पोकळी होय. ही पोकळी दयाळूपणानेच भरता येते. दयाळूपणा हा मानसिक आरोग्यासाठी औषध आहे, सामाजिक ऐक्याचा पाया आहे, संघर्ष निराकरणाचे साधन आहे आणि मानवी अस्तित्व टिकवून ठेवण्याचे मूलतत्त्व आहे.

दयाळूपणाचे समाजशास्त्रीय एक महत्त्वाचे तत्त्व म्हणजे 'सामाजिक भांडवल' (Social Capital) होय. जेव्हा समाजातील लोक एकमेकांशी सहानुभूतिपूर्ण, सहयोगी आणि विश्वासू संबंध राखतात तेव्हा समाज अधिक सुदृढ, सुरक्षित आणि प्रगत होतो. दयाळूपणा वाढला की समुदायांमध्ये एकत्रित कार्यक्षमता वाढते. उदा. एखाद्या गावात किंवा वस्तीत संतुलित आणि मदतशील वातावरण असल्यास त्या ठिकाणी गुन्हेगारी कमी असते, एकोपा अधिक असतो, संकटात सर्व एकत्र उभे राहतात, आणि विकासाची प्रक्रिया अधिक सुकर होते. म्हणजेच दयाळूपणाचा समाजावर व्यापक आर्थिक, सांस्कृतिक आणि राजकीय परिणामही असतो.

शाळा, कुटुंब, मित्रमंडळी, समाजसंस्था आणि शासनव्यवस्था या सर्व पातळ्यांवर दयाळूपणा हे मूल्य पेरणे गरजेचे आहे. बालक हा जे पाहतो ते शिकतो. जर घरातील वातावरण करुणामय, जिव्हाळ्याचे, संवेदनशील असेल तर मूलही तसेच मूल्य आत्मसात करते. शाळांनी फक्त स्पर्धा नव्हे तर सहकार्य, परस्पर मदत, समूहभावना, विविधतेचा सन्मान ही मूल्ये शिकवणे आवश्यक आहे. समाजातील माध्यमांनी हिंसा, द्वेष, भेदभाव, असहिष्णुता यांना हवा देण्याऐवजी मानवतेचे उदाहरण घडवणाऱ्या कथा पुढे आणल्या पाहिजेत. शासनाच्या धोरणांतही दुर्बल घटक, वंचित समुदाय, अपंग, वृद्ध, अनाथ, महिला आणि पीडित यांच्यासाठी आधारयोजना दयाळूपणेच्या भावनेतूनच प्रभावीपणे लागू केल्या जाऊ शकतात.



दयाळूपणा हा एखाद्याने 'जास्त' आणि एखाद्याने 'कमी' असा मोजण्याचा विषय नाही. दयाळूपणा हा प्रत्येकासाठी साधा, सहज आणि सर्वांच्या आवाक्यातील भाव आहे. आपण ज्या क्षणी एखाद्याच्या चेहऱ्यावर हास्य आणतो, त्या क्षणी आपण जग थोडेसे अधिक सुंदर बनवत असतो. आणि जग सुंदर व्हावे यासाठी मोठमोठे जागतिक करार किंवा महाकाय क्रांतींची गरज नसते तर गरज असते ती प्रत्येक मनातील लहान, सोप्या आणि सातत्यपूर्ण दयाळूपणाच्या कृतीची.

शेवटी, दयाळूपणा हा कोणताही 'दिवस' नसून जीवनशैली आहे. हा दिवस आपल्याला केवळ स्मरण देते की आपण माणूस म्हणून जगण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. आपण कितीही विकसित, शिक्षित, सक्षम किंवा संपन्न झालो तरी 'दयाळूपणा' नसल्यास आपण अपूर्ण आहोत. म्हणूनच या जागतिक दयाळूपणा दिनाच्या निमित्ताने प्रत्येकाने स्वतःला एक साधा प्रश्न विचारावा की मी कुणासाठी आज 'थोडेसे अधिक माणूस' होऊ शकतो? या प्रश्नाचे उत्तर म्हणजेच मानवतेचा खरा उत्सव होय. कारण जग बदलण्यासाठी कधीकधी मोठा अभिमान नको असतो तर फक्त एक छोटासा दयाळू हात पुरेसा असतो.

- डॉ. राजेंद्र बगाटे,
(समाजशास्त्राचे अभ्यासक)
मो. क्र. ९९६०१०३५८२,
ईमेल - bagate.rajendra5@gmail.com

# 'राष्ट्रीय जल पुरस्कारा'त महाराष्ट्राचा प्रथम क्रमांक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




मुंबई : केंद्रीय जलशक्ती मंत्रालय, जल संसाधन, नदी विकास व गंगा संरक्षण विभाग, यांच्या वतीने जाहीर करण्यात आलेल्या राष्ट्रीय जल पुरस्कार २०२४ मध्ये महाराष्ट्रराज्याने देशातील सर्वोत्कृष्ट राज्याचा पहिला क्रमांक पटकावला आहे. पाणी संवर्धन आणि व्यवस्थापन क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल हा सन्मान महाराष्ट्र राज्याला जाहीर झाला आहे.

या पुरस्कारात महाराष्ट्रासोबतच नवी मुंबई महानगरपालिकेने सर्वोत्कृष्ट शहरी स्थानिक संस्था या गटात प्रथम क्रमांक मिळवला आहे, तर कनिफनाथ जल/पाणी वापर सहकारी संस्था, नाशिक यांनी सर्वोत्कृष्ट जल/पाणी वापर संस्था या श्रेणीत द्वितीय क्रमांक पटकावला आहे.

याबाबत केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाचे सचिव व्ही.एल. कान्ता राव यांनी राज्याचे मुख्य सचिव राजेशकुमार यांना पत्राद्वारे कळविले आहे. हा पुरस्कार वितरण समारंभ १८ नोव्हेंबर २०२५ रोजी नवी दिल्ली येथील विज्ञान भवनात पार पडणार असून, राज्याला ट्रॉफी, प्रशस्तिपत्र आणि रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात येणार आहे. राज्याच्या जलसंधारण, जलव्यवस्थापन आणि नदी पुनरुज्जीवन क्षेत्रात करण्यात आलेल्या प्रयत्नांना राष्ट्रीय पातळीवर मान्यता मिळाल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जलसंपदा (तापी विदर्भ व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री गिरीश महाजन, आणि जलसंपदा (गोदावरी व मराठवाडा खोरे विकास महामंडळ) मंत्री राधाकृष्ण विखे पाटील तसेच जलसंपदा विभागाचे अभिनंदन केले आहे.

**राज्याच्या जलसंपदा विभागाला मिळालेल्या पुरस्कारामुळे दुष्काळमुक्त महाराष्ट्राच्या ध्येयाला अधिक गती - मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील**

जलसंपदामध्ये राज्याला संपन्न करण्यासाठीच्या प्रयत्नांना यामुळे नवी दिशा आणि प्रेरणा मिळाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यातील जलसंपदा विभागाने राबविलेल्या जलसंवर्धन, सिंचन आणि जलव्यवस्थापनातील नवकल्पनांना आता राष्ट्रीय पातळीवर मान्यता मिळाली आहे. या पुरस्कारामुळे महाराष्ट्राच्या पाण्याचे शाश्वत व्यवस्थापन आणि दुष्काळमुक्त महाराष्ट्राच्या ध्येयाला अधिक गती मिळेल, असा विश्वास जलसंपदा ( गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी व्यक्त केला.

**जलसंपदा विभागाच्या कामांवर राष्ट्रीय सन्मानाची मोहोर - मंत्री गिरीश महाजन**

हा सन्मान राज्यातील पाणी संवर्धन उपक्रमांना नवी ऊर्जा देणारा ठरेल, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली जलसंपदा विभागाच्या विकासकामांवर राष्ट्रीय सन्मानाची मोहोर लागली आहे असे जलसंपदा (विदर्भ, तापी, कोकण खोरे विकास महामंडळ) व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन म्हणाले.

# कुर्डुवाडीच्या विकासासाठी तुतारी-धनुष्यबाणाची युती



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कुर्डूवाडी : कुर्डूवाडी शहराच्या सर्वांगीण विकासासाठी शिवसेना (धनुष्यबाण) व शरदचंद्रजी पवार राष्ट्रवादी पक्ष (तुतारी) एकत्र आणण्यासाठी खासदार धैर्यशील (भैया ) मोहिते पाटील यांचा करमाळ्याचे आमदार नारायण आबा पाटील व माढा लोकसभा संपर्कप्रमुख संजय (बाबा) कोकाटे यांना युती बाबत फोन व चर्चेअंती नारायण आबांचा व संजय बाबाचा होकार आणि तुतारी व धनुष्यबानाची युती झाली.

यावेळी खासदार धैर्यशील भैय्या मोहिते पाटील साहेबांसोबत तात्यासाहेब गोडगे शिवसेना जिल्हा उपप्रमुख, तालुका अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी बाळासाहेब पाटील, आनंद टोणपे (शिवसेना तालुकाप्रमुख), संभाजी सातव (शिवसेना शहर प्रमुख), दत्ताजी गवळी (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शहराध्यक्ष), लतीफ भाई मुलानी माजी नगरसेवक, शंकर बागल (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष किसान सेल जिल्हाध्यक्ष) यांच्यामध्ये सविस्तर चर्चा झाली व निवडणुकीत एकत्रितपणे सामोरे जाऊन विजय संपादन करून कुर्डूवाडी चा विकास करण्याचे निश्चित झाले.

## ३८ वर्षांनंतर कृषी विभागाला मिळाले नवे बोधचिन्ह आणि घोषवाक्य

## बोधचिन्हामधून शेतकऱ्यांची शक्ती, तंत्रज्ञान, आणि पर्यावरणपूरक विकासाचा संदेश

# कृषी विभागाचे नवे बोधचिन्ह आणि घोषवाक्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते अनावरण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




मुंबई : राज्य कृषी विभागाच्या नवीन बोधचिन्हाचे तसेच 'शाश्वत शेती - समृद्ध शेतकरी' या नवीन घोषवाक्याचे अनावरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सह्याद्री अतिथीगृह येथे केले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या उपस्थितीत कृषी विभागाचे नवे बोधचिन्ह आणि घोषवाक्याचे अनावरण करण्यात आले. तसेच बोधचिन्ह स्पर्धेतील विजेता आणि घोषवाक्य स्पर्धेतील विजेत्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

यावेळी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, क्रीडा मंत्री ड. माणिकराव कोकाटे, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, कृषी राज्यमंत्री ड. आशिष जयस्वाल, मुख्य सचिव राजेश कुमार, कृषी आयुक्त सूरज मांढरे, उपसचिव प्रफुल्ल ठाकूर, संचालक रफिक नाईकवाडी, कृषी विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

**नवे बोधचिन्ह म्हणजे नव्या युगातील नव्या कृषी विचारांचा आरंभ - कृषी मंत्री दत्तात्रय भरणे**

महाराष्ट्राची शेती ही परंपरेशी जोडलेली असूनही सतत नव्या दिशेने वाटचाल करणारी आहे. कृषी विभागाचे हे नवे बोधचिन्ह म्हणजे केवळ प्रतीक नाही, तर महाराष्ट्राच्या शेतीचा आधुनिक चेहरा आहे. या बोधचिन्हामधून शेतकऱ्यांची शक्ती, तंत्रज्ञान, आणि पर्यावरणपूरक विकासाचा संदेश दिला आहे. हे बोधचिन्ह आणि घोषवाक्य राज्यातील प्रत्येक शेतकऱ्यांच्या प्रगतीचे प्रतीक बनेल. हा बदल म्हणजे 'नव्या युगातील नव्या कृषी विचारांचा आरंभ आहे, असे कृषी मंत्री श्री. भरणे यांनी सांगितले.

कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले, कृषी विभागाचे विद्यमान बोधचिन्ह ३८ वर्षांपूर्वी तयार करण्यात आले होते. या कालावधीत शेतीत तंत्रज्ञान, यांत्रिकीकरण, नैसर्गिक शेती, हवामानबदल आणि उत्पादनाच्या नव्या दिशा अशा अनेक मूलभूत परिवर्तनांच्या पार्श्वभूमीवर विभागाची दृश्य आणि संवादात्मक ओळख अद्ययावत करण्याची गरज निर्माण झाली होती. या उद्देशाने कृषी विभागाने खुली स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेत जास्तीत जास्त प्रस्ताव प्राप्त व्हावे यासाठी कृषी विभागाच्या संकेतस्थळावर सार्वजनिक आवाहन समावेशित करण्यात आले. कला महाविद्यालयातील आणि कृषी विद्यापीठातील विद्यार्थी, प्राध्यापक, संशोधक, अभ्यासक, कलाकार, डिझायनर्स, लेखक, अधिकारी, कर्मचारी आणि अन्य इच्छुक व्यक्तींना प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन करण्यात आले होते. या स्पर्धेला अत्यंत उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला ज्यात एकूण ७६१ बोधचिन्ह आणि ९४९ घोषवाक्य प्रस्ताव प्राप्त झाले.

कृषी मंत्री भरणे म्हणाले, प्राप्त प्रस्तावांचे परीक्षण करण्यासाठी कृषी आयुक्तांच्या मान्यतेने समिती गठित करण्यात आली. या समितीने प्रत्येक प्रस्तावाचा तपशीलवार अभ्यास करून उत्कृष्ट कल्पनांची निवड केली.

अंतिम निवड समितीने शासनास प्रत्येकी तीन बोधचिन्ह आणि तीन घोषवाक्यांची शिफारस केली, ज्यांपैकी एकाची निवड शासनाने केली. ७ नोव्हेंबर २०२५ रोजी या नव्या बोधचिन्ह आणि घोषवाक्याला कृषी विभागाकडून मान्यता देण्यात आली आणि याचे अनावरण करण्यात आले. बोधचिन्ह स्पर्धेतील विजेते विरेंद्र भाईदास पाटील (क्रेझी क्रिएशन्स, भुसावळ) आणि घोषवाक्य स्पर्धेतील विजेत्या सिद्धी भारतराव देसाई (परभणी) यांचे कृषी विभागातर्फे कृषीमंत्री भरणे यांनी अभिनंदन केले.

**भविष्यातील वापर आणि अधिकार**

या नव्या उपक्रमामुळे कृषी विभागाची दृश्य ओळख अधिक सशक्त होणार असून, यापुढे कृषी विभागाच्या सर्व अधिकृत उपक्रमांमध्ये हे नवे बोधचिन्ह आणि घोषवाक्य वापरले जाणार आहे. हे बोधचिन्ह आणि घोषवाक्य कृषी विभागाचे असून, त्याचा अनधिकृत वापर केल्यास संबंधितांवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा पुरवण्यासाठी सेवांची प्रभावी अंमलबजावणी करावी

## सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर; आरोग्य सेवेच्या गुणवत्तेसाठी रचनात्मक उपक्रमांवर भर देण्याचे निर्देश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई, दि. १२ : राज्यातील आरोग्यसेवा अधिक प्रभावी आणि दर्जेदार करण्यासाठी विभागामार्फत रचनात्मक कामांवर भर द्यावा, तसेच नागरीकांना पुरवण्यात येणाऱ्या आरोग्य सेवांची प्रभावी अंमलबजावणी करावी असे निर्देश सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले. आरोग्य भवन येथे आरोग्य विभागाच्या विविध सेवांचा आढावा मंत्री आबिटकर यांनी घेतला त्या वेळी ते बोलत होते. या बैठकीत लसीकरण, कर्करोग निदान, सिकल सेल नियंत्रण, मानसिक आरोग्य, मधुमेह आणि उच्च रक्तदाब या विषयांवर चर्चा झाली.

बैठकीस आरोग्य सेवा आयुक्त कादंबरी बलकवडे, आरोग्य संचालक डॉ. नितीन अंबाडेकर, संचालक डॉ. विजय कंदेवाड, सहसंचालक डॉ. सुनिता कोल्हाहित, सहसंचालक सांगळे, सहाय्यक संचालक दीप्ती पाटील देशमुख यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

आरोग्य विभागाचा निधी रचनात्मक आणि परिणामकारक कामांवर खर्च व्हावा असे सांगून सार्वजनिक आरोग्य मंत्री आबिटकर म्हणाले की, विशेषतः लसीकरण, कर्करोग निदान व उपचार, तसेच सिकल सेल अनुवांशिक आजार नियंत्रणासाठी ठोस उपक्रम राबवावेत. या सेवांसाठी आवश्यक निधी



नियोजनपूर्वक वितरित करावा. राष्ट्रीय आरोग्य अभियान (एनएचएम) अंतर्गत देशभरात सुरू असलेल्या नवकल्पनांचा अभ्यास करून, महाराष्ट्रासाठी उपयुक्त योजना समाविष्ट कराव्यात. विभागाने तज्ज्ञांचे मत जाणून घेत नियोजन करावे, तसेच आरोग्यसेवा पुरवताना नागरिकांना अधिकाधिक सुविधा मिळतील याची काळजी घ्यावी, असे श्री. आबिटकर यांनी सांगितले.

सार्वजनिक आरोग्य मंत्री आबिटकर म्हणाले की, आशा सेविकांचे मानधन वेळेत मिळावे, यासाठी काटेकोर पावले उचलावीत. विलंब करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी. तसेच डीबीटी योजनेंतर्गत निधी लाभार्थ्यांच्या खात्यावर वेळेत पोहोचावा, यासाठी प्रक्रियेमध्ये सुधारणा करण्यावर भर देण्यात यावा. गरजेच्या वस्तूंचीच खरेदी सीएसआर माध्यमातून करावी, तसेच गरजू रुग्णांना आरोग्यसेवा पुरवण्यासाठी सीएसआर निधीचा उपयोग व्हावा, यासाठी तरतूद करावी.आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी आवश्यक निधीची तरतूद करावी, तसेच पॉलिएटिव्ह केअर कार्यक्रम प्रभावीपणे राबवावा, कर्करोग रुग्णांना दर्जेदार सेवा मिळाव्यात यासाठी स्वतंत्र मूल्यमापन समिती नेमावी. मानसिक आरोग्य, आयूष सेवांचा विस्तार आणि आरोग्यविषयक जनजागृती या विषयांवर विशेष भर द्यावा. नागरिकांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेऊन नियोजन करावे, राज्यातील सर्व आरोग्य समन्वयकांच्या मासिक बैठका घेऊन कामाचे मूल्यमापन नियमितपणे करावे, विभागाच्या अधिकाऱ्यांनी आपल्या अनुभवाचा उपयोग करून सेवांचा दर्जा उंचवावा, असे निर्देशही सार्वजनिक मंत्री आबिटकर यांनी दिले.

# एसबीआय वगादरी शाखेकडून मृतांच्या वारसांना २० लाख रुपयांचा विमा भरपाई



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : एसबीआय जनरल इन्शुरन्स अंतर्गत विमा उतरवलेले तुळजापूर तालुक्यातील बोळेगाव येथील रहिवासी परमेश्वर सुरवसे यांच्या वारसदार पत्नी अनुसया सुरवसे यांना एसबीआय वगादरी शाखेकडून २० लाख रुपयांचा विमा धनादेश देण्यात आला.

मंगळवारी वगादरी शाखेत झालेल्या एका साध्या कार्यक्रमात शाखा व्यवस्थापक केदारनाथ चौगुले यांनी अनुसया सुरवसे यांना २० लाख रुपयांचा धनादेश सादर केला. परमेश्वर अर्जुन सुरवसे यांचे वगादरी शाखेत खाते होते आणि काही दिवसांपूर्वी अपघातात त्यांचे निधन झाले. त्यांनी एसबीआय जनरल इन्शुरन्स अंतर्गत १ हजार रुपयांचा विमा काढला होता. चेक वाटप केल्यानंतर बोलताना विमा व्यवस्थापक कुमार उसाकोयल म्हणाले की, आजच्या धकाधकीच्या जीवनात एखाद्या व्यक्तीचे काय होईल हे सांगता येतनाही . कुटुंबप्रमुखाला काही झाले तर कुटुंब रस्त्यावर येतो. त्यांचे कुटुंबियाचे हाल होते. त्यांचे जीवन जगण्याचे दुस्तरा होतो . जीवनाच्या सुरक्षेसमोर १ हजार रुपये ही फार मोठी रक्कम नाही. एसबीआय जनरल इन्शुरन्स अंतर्गत काढलेल्या विम्यामुळे, आज कुटुंबप्रमुखाचा अपघातात मृत्यू झाला असला तरी, हा विमा त्यांच्या कुटुंबासाठी उपयुक्त ठरला. २० लाख रुपयांचे विमा कव्हर असल्याने, त्यांनी अधिकाधिक ग्राहकांना हा विमा काढण्याचा सल्ला दिला. अधिकारी रोहित गायकवाड, निलेश पाटील, सिद्धार्थ बिंदगे, अंकुश सावंत, धनप्पा सलगरे आणि सुरवसे कुटुंबातील इतर सदस्य उपस्थित होते.

# कवी प्रतिक पवार यांच्या पुस्तकांना का घाबरतात माणसं? या काव्यसंग्रहाचे प्रकाशन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : बुद्ध हा वाङ्मयाचा पहिला महत्त्वाचा समीक्षक असून प्रतिक पवार यांची कविता बुद्धाच्या समीक्षेच्या प्रणालीवर आधारित समताधिष्ठित सामाजिक पुनर्रचनेचा एक विचार आहे असे प्रतिपादन बौद्ध संस्कृतीचे अभ्यासक प्रा. आनंद देवडेकर यांनी हेतकर्स पब्लिकेशनच्या कवी प्रतिक स्मिता उत्तम पवार यांच्या 'पुस्तकांना का घाबरतात माणसं? या काव्यसंग्रहाच्या प्रकाशन सोहळ्यात केले.



सम्यक साहित्य संसद, सिंधदुर्ग आणि रुईया मराठी भाषा आणि वायय मंडळ व मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने कवी प्रतिक स्मिता उत्तम पवार यांच्या, हेतकर्स पब्लिकेशनने प्रकाशित केलेल्या 'पुस्तकांना का घाबरतात माणसं?' या काव्यसंग्रहाचा प्रकाशन सोहळा नुकताच माटुंग्यातील रुईया महाविद्यालयाच्या सभागृहात संपन्न झाला. सदर काव्यसंग्रहाचे प्रकाशन बौद्ध संस्कृतीचे अभ्यासक व सद्धम्म पत्रिकेचे संपादक प्रा.आनंद देवडेकर यांच्या हस्ते झाले. या काव्यसंग्रहावर भाष्य करण्यासाठी चर्चा सत्रात चर्चक म्हणून रुईया महाविद्यालयाच्या मराठी भाषा आणि वायय मंडळ प्रमुख प्रा. शिल्पा नेवे, ज्येष्ठ साहित्यिक, विचारवंत डॉ. श्रीधर पवार, मराठवाड्यातील कवी, साहित्यिक प्रा. रामप्रसाद वाव्हळ आणि प्रकाशक शिलालेखकार सुनील हेतकर यांनी सहभाग घेतला होता. कार्यक्रमाची सुरुवात कवी प्रतिक पवार यांच्या 'चल बंड करू' या गीताच्या प्रक्षेपणाने झाली. तर ज्येष्ठ विचारवंत, साहित्यिक ज.वि.पवार, सिने अभिनेत्री, लावणी सम्राज्ञी मेघा घाडगे, देवगिरी महाविद्यालयाच्या मराठी विभाग प्रमुख डॉ. समिता जाधव व युवा गझलकार अविनाश काठवटे यांच्या शुभेच्छापर व्हिडिओंचे प्रक्षेपण करण्यात आले. रुईया महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी सई कदम आणि आभा भोसले या विद्यार्थिनींनी काव्यसंग्रहातील काही कवितांचे अभिवाचन करून वातावरण भावनिक केले.

कवी प्रतिक पवार यांच्या कवितेला शाहिरी बाजाची झालर असून ती लोकशाहीपूरक विचार प्रभावीपणे पेरते, असे उद्गार कार्यक्रमाचे अध्यक्ष सम्यक साहित्य संसद, सिंधुदुर्गचे उपाध्यक्ष व 'सूर्योन्मुख शतकांच्या दिशेने' या काव्यसंग्रहाचे कवी प्राचार्य सिद्धार्थ तांबे यांनी काढले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसिद्ध सुत्रनिवेदक राजेश कदम यांनी आपल्या दमदार शैलीत केले. युवा कार्यकर्ती स्नेहल तांबे हिने कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले तर रुईया महाविद्यालयाची विद्यार्थिनी रक्षिता घोले हिने कार्यक्रमात आभाराचे सूत्र सांभाळले. संपूर्ण कार्यक्रम यशस्वीपणे पार पडण्यासाठी सम्यक साहित्य संसद, सिंधुदुर्ग यांचे सर्व पदाधिकारी, रुईया महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. अनुश्री लोकूर, उपप्राचार्य डॉ. वैभवी पळसुले, मराठी विभागाच्या सहाय्यक प्राध्यापिका आश्लेषा राणे आणि वायय मंडळाच्या स्वयंसेवकांनी सहकार्य केले.

# वीरशैव कक्कय्या समाज विकास मंडळचा वार्षिक स्नेहसंमेलन आणि भव्य वधुवर मेळावा संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे/दत्ता खंदारे : वीरशैव कक्कय्या समाज विकास मंडळचा ३२वा वार्षिक स्नेहसंमेलन आणि भव्य वधुवर मेळावा,गुणवंत विद्यार्थी सत्कार,विशेष प्राविण्य सत्कार आणि जीवन गौरव पुरस्कार समारंभ रविवार दि. ९नोव्हेंबर रोजी गणेश कला क्रीडा मंच, स्वारगेट पुणे येथे आयोजन करण्यात आला होता.

विखुरलेल्या कक्कय्या समाज बांधवाना एकत्र आणण्याचे काम पुणे येथील वीरशैव कक्कय्या समाज विकास मंडळ दरवर्षी नित्य नियमाने करत असते. त्यामुळे समाज संघटित होण्यास मदत होते शिवाय एकमेकांच्या विचारांची देवाघेवाण होते.

सदर वार्षिक स्नेहसंमेलनाच्या अध्यक्षस्थानी पुणे मंडळाचे अध्यक्ष श्री हनुमंतराव सोनवणे होते.तसेच कार्यक्रमास समस्त कक्कय्या महासंघाचे अध्यक्ष श्री निवृत्ती सावळकर,भिक्षेकरूचे डॉक्टर अभिजीत सोनवणे,कक्केरी देवस्थानचे अध्यक्ष श्री विठ्ठल पोळ व संचालक एडव्होकेट श्री केशव इंगळे, कोल्हापूर येथील उद्योजक श्री अनिल पोळ, गणेश नारायणकर, जेष्ठ साहित्यिक ना.म.शिंदे, पोलिस साहाय्यक आयुक्त श्रीमती प्रांजलीताई सोनवणे,संत कक्कय्या विकास संस्था धारावीचे अध्यक्ष श्री शिवलिंग व्हटकर व सचिव श्री राजेश खंदारे,कोल्हापूर मंडळाचे अध्यक्ष श्री शिवाजी पोळ,मिरज येथील समाजसेविका श्रीमती प्रतीक्षाताई सोनवणे,चाळीसगावचे अध्यक्ष श्री शिवलाल साबणे, पुणे सकाळ चे मुख्य वार्ताहर श्री अनिल सावळे ,पुणे येथील माजी अतिरिक्त आयुक्त , आयकर विभाग श्री किशोर कवडे , प्रकाश दरवेशी, राम कोकणे , युवा उद्योजक अभिजित सोनवणे , गणपती शिंदे इ. प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.वार्षिक स्नेहसंमेलन मध्ये समाजातील १०वी आणि १२ वी तील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच विशेष प्राविण्य मिळविलेल्या मध्ये प्रदीप सावळकर, सूर्यकांत इंगळे, दिपक गायकवाड इ.चाही विशेष सत्कार करण्यात आला. या वर्षीचा जीवन गौरव पुरस्कार समाज्यातील जेष्ठ समाजसेवक डॉ सीताराम चौगुले यांना देऊन गौरविण्यात आले.

या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र, कर्नाटक,आंध्र प्रदेश, तेलंगणा व गुजरात येथील तीन हजार समाज बांधवांनी उपस्थित राहून लाभ घेतला.अध्यक्ष हनुमंतराव सोनवणे यांनी सांगितले की पुणे येथे मंडळाच्या ऑफिस साठी ५५० चौ फूटाचा फ्लॅट घेण्याचे निश्चित केले असून त्याची किंमत ४० लाखा पर्यंत जाते. या जागेचे अग्रीमेंट या महिना अखेर होईल. मंडळाकडे २८ लाख रुपये आहेत, उर्वरित रक्कमेसाठी समाज्यातील सदन व्यक्तींनी हातभार लावावा असे ही आवाहन करण्यात आले. कार्यक्रमा मध्ये विठ्ठल पोळ, डॉ अभिजित सोनवणे,जेष्ठ साहित्यिक ना.म.शिंदे, निवृत्ती सावळकर यांनी मार्गदर्शन केले.

दुपारच्या सत्रात वधू वर मेळावा घेण्यात आला. यासाठी अंदाजे २०० वधू वरानी नोंदणी केली.



सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पुणे मंडळाचे अध्यक्ष श्री हनुमंतराव सोनवणे, संस्थापक अध्यक्ष डॉ धनंजय कोकणे, कार्याध्यक्ष श्री वसंत केळगंड्रे, सचिव एडव्होकेट श्री गंगाधर कोकणे , उपाध्यक्ष एडव्होकेट भीमाशंकर कटके व उल्हास कटके खजिनदार शांताराम गजरे,सहसचिव अशोक सदाफुले, माजी अध्यक्ष डॉ राय्यप्पा कटके, निरंजन होटकर, डॉ तानाजी कटके सुनील सोनवणे, शंकर कटके, सूर्यकांत सोनवणे,दयानंद कोकणे,सुनील फुलपगार, शिवाजी शिंदे , रोहित खरटमल यांनी विशेष परिश्रम घेतले. या वेळी श्री लक्ष्मीकांत सदाफुले यांनी सर्व समाज बांधवांना स्नेह भोजन दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ पी डी सोनवणे व वृषाली कटके यांनी केले.आभार प्रदर्शन भीमाशंकर कटके यांनी केले.

## भीमशक्तीचा रास्ता रोको आंदोलन

# अजित पवार राजीनामा द्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : सोलापूर पुणे येथील. मुंडावा. याठिकाणी असणारी. ४३एकर. जमीन. तिची बाजारात. किंमत १८००शे. कोटी. परंतु अजित पवार यांचा मुलागा. पार्थ पवार याने थेथील स्थानिक. प्रशशाकीय अधिकारी यांना. हाथाशी धरून. पार्थ. पवार याने अवघ्या ३००कोटी. रु मध्ये टी. कामिनी खरेदी केली त्या मध्ये शासनाची. स्टॅम्प ड्युटी. २१००कोटी रु होते परंतु पार्थ. पवार. याने फक्त ५००₹च्या स्टॅम्प वर. खरेदी केली म्हणजेच एक प्रकारे. महार वाटणी. असलेली जमीन. अवघया ३००कोटी रु मध्ये खरेदी. दाखवून जमीन. घोटाळा केला आहे. या मद्ये काही प्रशासकीय लोकांना निळंबीत. केले आहे या सर्व प्रकारणांशी पार्थ पवार हे दोषी. असून त्याची नैतिक जबादारी स्वीकारून मंत्री पदाचा राजीनामा द्यावा. यामागणी साठी भीमशक्ती. सामाजिक संघटनेच्या वतीने पुणे नका याठिकाणी रस्तारोको आंदोलन करण्यात आले.




यावेळी. भीम शक्ती संघटनेचे. प्रदेश सरचिटणीस सुबोध. वाघमोडे प म सरचिटणीस राजाभाऊ कदम शहर अध्यक्ष. उमेश सुरते. प्रदेश चिटणीस. संजय रणदिवे शहर कार्याध्यक्ष मनोज. लोंढे. महिला शहर अध्यक्ष ज्योती गायकवाड. रमाबाई लालसरे. रुपाली कोळी. युवक अध्यक्ष मयूर तळभडारे. प्रेमलता मेजर सुखदेव साबळे सलीम मुल्ला प्रकाश सीताफळे दक्षिण सोलापूर ता अध्यक्ष चंद्रशेखर गायगावळी सोमनाथ होतकर. कीर्ती शिवशरण प्रकाश बनसोडे राजा नागटिळक अशोक नागटिळक इब्राहिम शेख रवी चंद्रकर शशिकांत कांत. विरसूर मिलिंद कांबळे सचिन सुरवसे अशोक व्होतकर छाया इर्केरे नवगिरे ताई सतीश ढवरे इत्यादी प्रमुख. पदाधिकारी उपस्थित. होते

# राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षच्या निवडणूक समितीच्या कोअर कमिटी सदस्यपदी नागेश फाटे यांची नियुक्ती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार, पक्षाच्यावतीने आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती, महानगरपालिका, नगरपालिका या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार सोलापूर जिल्हा ग्रामीणच्या वतीने निवडणूक समिती स्थापन करण्यात आली आहे.

या समितीच्या कोअर कमिटी सदस्यपदी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, उद्योग व व्यापार विभागाचे प्रदेशाध्यक्ष नागेश फाटे, सागर पडगळ यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

याबाबतचे पत्र जिल्हाध्यक्ष वसंत देशमुख, कार्याध्यक्ष रवींद्र पाटील यांनी नुकतेच प्रसिद्धी माध्यमांना दिले आहे.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक प्रक्रियेला सुरुवात झाली असून पहिल्या टप्प्यात नगरपालिका, नगरपंचायत तर दुसऱ्या टप्प्यात जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि म

**राष्ट्रवादीचा बालेकिल्ला राखण्यासाठी पक्षाकडून जोरदार मोर्चे बांधणी**

हानगरपालिकेसाठी निवडणूक प्रक्रिया पार पडणार आहे.

सध्या नगरपालिका आणि नगरपंचायतीच्या निवडणुकीची आचारसंहिता जाहीर झाले असून दोन डिसेंबर रोजी



मतदान आणि तीन डिसेंबर रोजी मतमोजणी निकालाची प्रक्रिया पार पडणार आहे.या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादीचा बालेकिल्ला म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सोलापूर जिल्ह्यात राष्ट्रवादी पक्षाच्या वतीने जोरदार मोर्चे बांधणी सुरू झाली आहे. नुकतीच अकलूज येथे माझी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली निवडणूक समितीची बैठक पार पडली होती. याप्रसंगी माढ्याचे खासदार धैर्यशील मोहिते पाटील, माळशिरसचे आमदार उत्तमराव जानकर, माढ्याचे आमदार अभिजीत पाटील, करमाळ्याचे आमदार नारायण पाटील, मोहोळ चे आमदार राजू खरे, जिल्हाध्यक्ष वसंत देशमुख, कार्याध्यक्ष रवींद्र पाटील, माजी मंत्री लक्ष्मणराव ढोबळे, माजी आमदार रमेश कदम, उद्योग व व्यापार विभागाचे प्रदेशाध्यक्ष नागेश फाटे, राष्ट्रवादीचे नेते अनिल सावंत, बाबुराव गायकवाड, सुरज देशमुख, सुवर्णाताई शिवपुरे, विनंती कुलकर्णी, बाळासाहेब शेख, धनंजय साठे उपस्थित होते.

# समाजात सकारात्मक परिवर्तन घडविण्याची प्रशासनात ताकद

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस; भारतीय प्रशासकीय सेवेतील परिविक्षाधीन अधिकाऱ्यांचा मुख्यमंत्र्यांसमवेत संवाद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : समाजातील शेवटच्या घटकाचे कल्याण हे ध्येय ठेवत त्यांच्या आयुष्यात सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्याची ताकद प्रशासनात आहे. त्यासाठी भारतीय प्रशासकीय सेवेचा उपयोग करावा. राज्याच्या विकासगाथेला पुढे नेण्याची जबाबदारी सार्थपणे सांभाळण्याची अपेक्षा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली.

प्रशासनात आलेल्या तुकडीने कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित तंत्रज्ञानाचा उपयोग करत नागरिक केंद्रित व जबाबदार प्रशासन व्यवस्था निर्माण करावी, असे आवाहनही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी केले. २०२४ च्या भारतीय प्रशासकीय सेवेतील आठ परिविक्षाधीन अधिकाऱ्यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याशी वर्षा निवासस्थानी संवाद साधला. यावेळी मुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ.श्रीकर परदेशी उपस्थित होते.

संवाद साधताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, महाराष्ट्र हे सर्वात जास्त नागरीकरण झालेले राज्य आहे. राज्यामध्ये ग्रामीण आणि नागरी विकास केंद्रित प्रशासन गरजेचे आहे. भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांकडे नागरी प्रशासनात मोठ्या प्रमाणावर काम करण्याची संधी आहे.

संतुलित व सर्वांगीण औद्योगिक विकासासाठी शासन १०० सुधारणा करीत आहे. या सुधारणांसाठी ' वॉर रूम' तयार करण्यात आली आहे. महसूल सुधारणांसाठी सल्लागार नेमण्यापेक्षा प्रशासनातील दांडगा अनुभव असलेल्या अधिकाऱ्यांची समिती स्थापन करण्यात आली आहे. त्यांच्या अनुभवाचा खूप चांगला परिणाम दिसून येत आहे, असेही



मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

शासनाने औद्योगिक प्रयोजनासाठी राज्यामध्ये अकृषक परवाना काढण्याची मोठी सुधारणा नुकतीच केली आहे. वेळखाऊ आणि क्लिष्ट प्रक्रिया दूर करीत राज्यात गतिमान प्रशासन देण्यावर शासनाचा भर आहे. महसूल विभाग अंतर्गत बरीच प्रक्रिया, सेवा ब्लॉक चेन पद्धतीवर आणण्यात येत आहे. त्यामुळे बऱ्याच प्रक्रिया जलद व अचूक होत आहेत, असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, संपूर्ण प्रशासकीय धोरणे, प्रक्रिया यांचे ' व्हिजिट' करून ' रिइंजिनिअरिंग' करण्यासाठी शासनाने १५० दिवसांचा कार्यक्रम आखला आहे. या माध्यमातून बऱ्याच सुधारणा करण्यात येत आहेत. राज्यात सार्वत्रिक औद्योगिक विकास होण्यासाठी गुंतवणूक वाढविण्यावर भर देण्यात येत आहे. मुंबई, पुणे प्रमाणेच छत्रपती संभाजी नगर, नागपूर, नाशिक यासह राज्यात अन्य भागात नवीन औद्योगिक पट्टे निर्माण करण्यात येत आहे. विदर्भामध्ये नागपूर - अमरावती औद्योगिक विकासाचा पट्टा तयार होत आहे. अमरावतीमध्ये पीएम मित्रा पार्क तसेच वस्त्रोद्योग पार्कमुळे औद्योगिक विकासाची परिसंस्था निर्माण करण्यात येत आहे. त्याचा परिणाम म्हणून अमरावती जिल्ह्यातील नांदगाव पेठ औद्योगिक वसाहतीत आज एकही भूखंड शिल्लक राहिलेला नाही. अमरावती विमानतळ नागरी वाहतुकीसाठी खुले करण्यात आले आहे. या ठिकाणी एअर इंडियाच्यावतीने आशिया खंडातील सर्वात मोठे 'पायलट ट्रेनिंग इन्स्टिट्यूट' उभारण्यात येत आहे.

दुर्गम, नक्षलग्रस्त असलेल्या गडचिरोलीची ओळख आता 'स्टील सिटी' म्हणून होत आहे. या जिल्ह्यात तीन लाख कोटींचे सामंजस्य करार उद्योगांसाठी करण्यात आले आहेत. समृद्धी महामार्गाने राज्याची राजधानी व उपराजधानी जोडली आहे. त्यामुळे गतीने दळणवळण यंत्रणा निर्माण झाली आहे. मराठवाड्याच्या विकासासाठी शक्तीपीठ महामार्ग महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. टोयोटा किर्लोस्कर कंपनी छत्रपती संभाजीनगरमध्ये प्रकल्प स्थापन करीत आहे. त्यामुळे या भागात विकासाची परिसंस्था अधिक बळकट होणार असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्र्यांनी यावेळी परिविक्षाधीन अधिकाऱ्यांचा परिचय करून घेतला. त्यांचा आतापर्यंतचा प्रवास, मागील अनुभव, महाराष्ट्रात काम करत असताना जाणवलेल्या चांगल्या बाबी, सुधारणा करणे गरजेचे असलेल्या बाबी याविषयीही विस्तृत संवाद साधला.

# स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरींगच्या प्रा. प्राजक्ता सातारकर यांना पीएच.डी. प्राप्त



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयुट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) च्या कॉम्प्यूटर सायन्स अँड इंजिनिअरिंग विभागात कार्यरत असलेल्या प्रा. प्राजक्ता अभिषेक सातारकर यांना नुकतीच पीएच.डी. प्राप्त झाली आहे. त्यांनी आपला शोधप्रबंध नांदेड मधील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठामध्ये सादर केला होता. पीएच.डी. प्राप्त केल्यामुळे डॉ. प्राजक्ता सातारकर यांचा स्वेरीमध्ये सत्कार करण्यात आला. त्यांनी अभियांत्रिकी मधील कॉम्प्यूटर सायन्स अँड इंजिनिअरिंग या विभागात 'इफीसिएंट फ्रेमवर्क डेव्हलपमेंट फॉर एन्हन्सिंग द परफॉर्मन्स ऑफ लायफाय बेस्ड नेटवर्क' या विषयावर आपला शोधप्रबंध सादर केला होता. या यशाबद्धल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

डॉ.जी.व्ही चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली, स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ. बी.पी.रोंगे यांच्या प्रेरणेने प्रा. प्राजक्ता सातारकर यांनी पीएच.डी. पूर्ण केली आहे. प्रा. प्राजक्ता सातारकर यांनी ऑप्टीकल कम्युनिकेशन क्षेत्रात महत्त्वपूर्ण संशोधन केले आहे. या संशोधनात त्यांनी नवीन प्रोटोकॉल डिझाईन केले आहे. प्रा. सातारकर यांनी पीएच.डी. दरम्यान ५ संशोधन पेपर प्रतिष्ठित नियतकालिकांमध्ये प्रकाशित केले आहेत आणि ४ पेपर आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये सादर केले आहेत तसेच आंतरराष्ट्रीय जर्नल मधून त्यांचे २५ शोधनिबंध प्रकाशित झाले आहेत. प्रा. प्राजक्ता सातारकर यांचे हे यश केवळ त्यांच्या समर्पण आणि कौशल्याचे प्रतीक नाही, तर स्वेरी महाविद्यालय, पंढरपूरला ही गौरवान्वित करणारे असे आहे. डॉ. प्राजक्ता सातारकर ह्या स्वेरी संचालित कॉलेज ऑफ इंजिनिअरींगच्या कॉम्प्यूटर सायन्स अँड इंजिनिअरिंग या विभागामध्ये गेल्या १८ वर्षांपासून उत्कृष्टपणे ज्ञानदान करत आहेत. पीएच.डी. प्राप्त झाल्याबद्दल डॉ. प्राजक्ता सातारकर यांचा गांधी जयंतीच्या निमित्ताने पुण्याच्या रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडच्या इनोव्हेशन विभागाचे व्हाईस प्रेसिडेंट श्रीकांत देव व सौ. देव यांच्या हस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये सत्कार करण्यात आला. संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे, संस्थेचे अध्यक्ष अशोक भोसले, उपाध्यक्ष सुरेश राऊत, सचिव डॉ. सुरज रोंगे, इतर विश्वस्त व पदाधिकारी, तसेच संस्थेअंतर्गत असणाऱ्या बी. फार्मसीचे प्राचार्य डॉ. एम. जी. मणियार, डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. एन.डी. मिसाळ, डी. फार्मसीचे प्राचार्य प्रा. सतिश मंडवे, इंजिनिअरींगच्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, कॉम्प्यूटर सायन्स अँड इंजिनिअरिंगच्या विभागप्रमुख डॉ. एस.पी. पवार, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी डॉ. प्राजक्ता सातारकर यांचे अभिनंदन केले आहे.

# प्रवेशानंतर कोठे समर्थकांनी घेतला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचा आशीर्वाद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : माजी महापौर स्व. महेश अण्णा कोठे यांच्या गटातील माजी नगरसेवक व सोलापुरातील आजी-माजी पदाधिकाऱ्यांनी काल भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केल्यानंतर आज पालकमंत्री जयकुमार भाऊ गोरे, आमदार देवेंद्र कोठे व युवा नेते माजी नगरसेवक प्रथमेश कोठे यांच्या नेतृत्वात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब यांची वर्षा निवासस्थानी भेट घेऊन आशीर्वाद घेतले.





याप्रसंगी दिवंगत महेश अण्णा कोठे यांच्याशी आलेल्या स्नेहपूर्ण संबंधांना उजाळा मिळाला. जानेवारी २०२५ मध्ये प्रयागराज येथे महेश अण्णा कोठे यांचे निधन झाल्यानंतर केवळ फडणवीस साहेबांच्या सहकार्यामुळेच पार्थिव सोलापूरला आणणे शक्य झाले, त्याबद्दल मनापासून आभार मानण्यासाठी आलो असल्याचे प्रथमेश कोठे यांनी सांगितले व ही मदत आयुष्यभर विसरता येणार नसल्याचा उल्लेख त्यांनी केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील महेश कोठे यांच्याशी पूर्वी झालेल्या भेटीचा संदर्भ देत त्यांच्या कार्यशैलीचा गौरव केला.

या भेटीप्रसंगी स्थायी समितीचे माजी सभापती विनायक कोंड्याल, माजी नगरसेवक गुरुशांत धुत्तरगांवकर, माजी नगरसेविका कुमुद अंकाराम, माजी नगरसेवक विठ्ठल कोटा, माजी नगरसेवक शशिकांत कैंची, परिवहन समितीचे माजी सदस्य परशुराम भिसे, संतोष सोमा, जोशी समाज शहर अध्यक्ष युवराज सरवदे, अक्षय वाकसे, तुषार पवार, वासुदेव यलदंडी, दिनेश गुर्रम, दीपक राजुल, वैभव दोशी, भीमाशंकर अंकाराम, सागर भोसले, स्वप्नील वाघमारे, अमित अंकाराम, सुमीत अंकाराम, आकाश भोसले, भोजराज माने, अमित जाधव, अमर शिंदे आदी उपस्थित होते.

# मुंबई विद्यापीठात आंबेडकर थॉट्स कोर्सचे विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे/प्रतिनिधी : मुंबई विद्यापीठात ,डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय संशोधन केंद्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकर थॉट्स पदव्युत्तर पदविका (पी.जी डिप्लोमा) कोर्स पूर्ण झाला असून यावेळी मुंबई विद्यापीठात २०२३-२०२४ या वर्षातील विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तत्वज्ञान विभागाच्या प्रमुख प्रा.प्रिया वैद्य होत्या.

यावेळी नवी मुंबई, मनपा माजी उपायुक्त तसेच ऐरोली डॉ. आंबेडकर स्मारकाच्या सल्लागार संध्या अंबाडे , डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय संशोधन केंद्र मुंबई विद्यापीठाच्या विभाग प्रमुख डॉ.मनिषा करणे उपस्थित होत्या. यावेळी रितेश कॉलरा यांनी डॉ. बाबासाहेबांच्या लेखन आणि भाषणांचे डिजिटल संग्रह, एआयसी, यूएसए चा एक प्रकल्प दाखवला. तर उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय संशोधन केंद्राच्या संचालक डॉ. मनीषा करणे, सहाय्यक प्रा. राशी बग्गा, सहाय्यक प्रा.





डॉ. सुमेध पारधे लिपिक सोनाली तरे तर कर्मचारी उपस्थित होते. तर २०२३-२०२४ या वर्षातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर थॉट्स पदव्युत्तर पदविका (पी.जी डिप्लोमा) कोर्स पूर्ण केल्याबद्दल

कोमल दवणे ( मुंबई )पूजा मोरे ( मुंबई ) रोहित शिंदे( मुंबई) मिलिंद जाधव( भिवंडी ) विश्वास पवार ( चिपळूण) नित्यानंद शर्मा ( मुंबई) या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर थॉट्स पदव्युत्तर पदविका (पी.जी डिप्लोमा) कोर्स २००५ पासून सुरू झाला असून, या डॉ. बाबासाहेब आंबेडकर थॉट्स पदव्युत्तर पदविका (पी. जी डिप्लोमा) कोर्सचा उपयोग विद्यार्थ्यांना त्यांच्या पुढील भविष्यात होणार असून, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल माहिती विशेष तज्ञांकडून मिळणार आहे.

असे आवाहन करण्यात करण्यात आले.

### आगामी नगरपरिषद, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक लढवण्यासाठी ठरले रणनीती

# मंगळवेढा तालुका समविचारी आघाडी बैठक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर प्रतिनिधी

ठरलं तर मग... या घोषणेसह मंगळवेढा तालुका समविचारी आघाडीचे महत्त्वपूर्ण बैठक लोकनेते सिद्धेश्वर आवसाळे यांच्या संपर्क कार्यालयात उत्साहात पार पडली, आगामी नगरपरिषद जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमध्ये एकत्रितपणे लढण्यात आलेले या बैठकीत घेण्यात आला. या बैठकीस माजी मंत्री लक्ष्मणराव ढोबळे, सहकार महर्षी बबनराव अवताडे, भैरवनाथ वरचे चेअरमन अनिल (दादा) सावंत, विठ्ठल चे माझी चेअरमन भगीरथ भालके, दामाजी शुगरचे संचालक सिद्धेश्वर अवताडे, काँग्रेस तालुकाध्यक्ष प्रशांत साळे, राष्ट्रवादी शरद पवार गट तालुकाध्यक्ष पांडुरंग चौगुले, रामभाऊ वाकडे, राहुल घुले, मुरलीधर सरकाळे, सोमनाथ माळी, प्रतीक किल्लेदार, सोमनाथ बुर्जी, प्रशांत गायकवाड यांच्यासह विविध राजकीय पक्षांचे स्थानिक पदाधिकारी सामाजिक संघटनाचे प्रतिनिधी, आणि कार्यकर्ते ही उपस्थित होते .



बैठकीचे अध्यक्ष स्थान आघाडीचे प्रमुख सरकार महर्षी बबनराव अवताडे यांनी भूषवले, यावेळी सर्व व्यक्तींनी एकमुखाने मत व्यक्त केली की मंगळवेढा तालुक्यात जनतेचा मूलभूत प्रश्नावर काम करणारी विकासा भिमुख आणि भ्रष्टाचार मुक्त सत्ता निर्माण करण्यासाठी सर्व समविचारी घटकांनी एकत्र करणे काळाची गरज आहे. बैठकीदरम्यान मंगळवेढा नगरपरिषद निवडणूक लक्षात घेऊन प्रभाग नेहा आढावा संभाव्य उमेदवारांची चर्चा, तसेच प्रचाराची पाला प्रारंभिक रूपरेषा ठरविण्यात आली याशिवाय जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीमध्ये देखील एकच पॅनल एकच धोरण ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला या बैठकीत बोलताना काही वक्त्यांनी सांगितले की मंगळवेढा विकासाच्या नावाखाली केवळ राजकारण झाले प्रत्यक्षात जनतेच्या प्रश्नाकडे कोणी लक्ष दिले नाही.आता बदलाची वेळ आली आहे युवक शेतकरी महिला कामगार यांच्या अशा आकांक्षा पूर्ण करणारी सत्ता आणण्यासाठी समविचारी आघाडी पुढाकार घेईल या बैठकीत आघाडीच्या कार्यकारणीची प्राथमिक रचना प्रचार समिती तसेच संवाद समन्वय समिती स्थापन करण्यात आली पुढील काही दिवसात घावणे बैठका घेऊन जनतेचा अभिप्राय जाणून घेण्याची ठरवले. बैठकीच्या शेवटी सर्व कार्यकर्त्यांनी एकता विकास आणि परिवर्तन या घोषणेचे वातावरण दाणा सोडले व माजी पदाधिकारी सामाजिक कार्यकर्ते युवक नेते महिला प्रतिनिधी तसेच तालुक्यातील विविध संघटनेचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# इतर मागास बहुजन कल्याण विभाग : मुलीचे शासकीय वसतिगृहातील मुलींची 'कॅप जेमिनी' या बहुराष्ट्रीय कंपनीमध्ये निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



सोलापूर/जिमाका : महाराष्ट्र शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या सोलापूर येथील जिल्हास्तरीय मुलीचे शासकीय वसतिगृह (इतर मागास बहुजन कल्याण) येथे प्रवेशित असणाऱ्या मुलीनी इंजिनिअरींग क्षेत्रात दैदिप्यमान यश प्राप्त केले.

सोलापूर शहरात जिल्हास्तरीय इतर मागास बहुजन कल्याण सोलापूर या कार्यालयाकडून चालविण्यात येणाऱ्या मुलीचे शासकीय वसतिगृह (इमाबक, सोलापूर) येथील इ.ढशलह. या वर्गात शिकणाऱ्या मुली १. श्रुती राहुल पवार २. अस्मिता हणमंत हळदे या दोन मुलीनी उत्तुंग भरारी घेत यशाला गवसणी घातलेल्या आहेत.

कु. पवार व कु. हळदे या दोन्ही मूली श्री. सिध्देश्वर महिला इंजिनिअरींग महाविद्यालयात इ.ढशलह. चौथ्या वर्षात शिकत असताना 'कॅम्र जेमिनी' या बहुराष्ट्रीय कंपनीमध्ये त्यांची निवड झालेली आहे. या कर्तृत्ववान मुलींची सर्वच स्तरातून कौतुक करण्यात येत आहे. या त्यांच्या यशाबद्दल सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, विभाग गणेश सोनटक्के, श्रीकांत आव्हाड, इतर मागास बहुजन कल्याण अधिकारी गट-ब आणि शासकीय मुलीचे वसतिगृह विभागाचे कार्यासन सांभाळणारे वरिष्ठ लिपिक मोनिका हिरेमठ मॅडम व श्री. बनसोडे , कार्यालयातील इतर कर्मचारी व वसतिगृहाचे अधिक्षक श्रीम. पुनम गायकवाड व वसतिगृहातील सर्वच कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन केले. कु. श्रुती पवार व कु. अस्मिता हळदे या विदयार्थीनीचे 'कॅम्र जेमिनी' या कंपनीमध्ये निवड झाल्यानंतर दोन्ही मुलीचे सत्कार करण्यात आले.

शासकीय मुलीचे (इमाबक) वसतिगृहात मिळणाऱ्या सोयी सुविधा व शैक्षणिक व व्यवसायिक मार्गदर्शन याबाबत कु. श्रुती पवार व कु. अस्मिता हळदे यांनी सहायक संचालक, इमावक सोलापूर गणेश सोनटक्के यांचे आभार व्यक्त केले. इतर मागास बहुजन प्रवर्गातील मुलींनी शासनाने चालविलेल्या मुलीच्या शासकीय वसतिगृहांचा लाभ घेवून स्वतःचा व समाजाचा विकास करावा, असे आव्हान कु. श्रुती पवार व कु. अस्मिता हळदे यांनी केले.